# बृहन महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन : काही विचार

फिलाडेल्फीयांत भरलेल्या BMM-2009 अधिवेशनाचे सूप ६ जूलैला वाजले. जवळ जवळ पांच हजार मराठी मंडळीनी या अधिवेशनास हजेरी लावली होती.

पहिल्या दिवशी २ तारखेला तांत्रीक आणि औद्योगिक विभागाचा शुभारंभ सांस्कृतीक आणि पर्यटन खात्याचे मंत्री मा. हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते झाला. अनेक मान्यवरांची या वेळी भाषणे झाली. भोजनानंतर दुपारी निरनिराळया तात्रिक विषयावर ज्येष्ठ नागरिकांसाठी महितीपर उपयुक्त परिसंवाद झाला. या परिसंवादात डॉ. देवन गबाले, डॉ. कर्वे, डॉ. मुतालिक इत्यादी नामवंत धन्वतरींनी भाग घेतला होता. या कार्यक्रमाची प्रसिध्दी व्हावी तितकी झाली नव्हती. किंबहुना मुख्य कार्यक्रम पत्रिकेत याचा उल्लेखही नव्हता. हा कार्यक्रम सादर करण्यांत प्रमुखतः श्री. अविनाश देशपांडे यांचा पुढाकार होता. परंतु असे सांगण्यांत येते की या कार्यक्रमास "देणग्या" मिळविण्याचे काम ऐनवेळी रद्द झाल्यामुळे कार्यकारिणीच्या "श्रेष्ठी"नी आपली मदत मागे घेतली. एवढंच नव्हे तर कार्यक्रमाच्या सभाग्रहांत ज्येष्ठ नागरिकांना फक्त बसण्यास खुर्च्या देण्यांत आल्या व टेबलाची सोय करण्यास नकार दिला. या कार्यक्रमास ९० ज्येष्ठ नागरिक उपस्थीत होते. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी या बद्दल तक्रारी केल्या असल्याचे समजते. ज्येष्ठ नागरिकांबद्दलची बुध्यापुरस्कर दाखविली गेलेली उपेक्षा लक्षांत येण्यासारखी होती.

रात्री मनोरंजनासाठी श्रीमती आशा भोसले यांचा हिन्दी गाण्याचा कार्यक्रन ठेवला होता. अपुऱ्या सभासद नोंदणीमुळे हा कार्यक्रम आमजनतेला खुला ठेवला होता. पण हा कार्यक्रम तितकासा रंगला नाही आणि लोकांची निराशा झाली.

अधिवेशनाला खरी सुरवात झाली ती तीन तारखेला. आदल्या दिवसापासून सुरू केलेली सभासद नोंदणीची व्यवस्था चोख होती. प्रारंभीची दिंडी जरा उशीरा सुरू झाली पण ती सभागृहांत आल्यावर उपस्थितांनी तिचे चांगले स्वागत केले. हा सुरवातीचा कार्यक्रम लक्षणीय होण्यासाठी त्या कार्यक्रमाला लागणारे फेटे इत्यादी सामान भारतांतून फेडरल एक्सप्रेसने मागविण्यांत आले व कार्यक्रम सादर करण्यांत आला. त्या नंतर निरनिराळया सभागृहांत उद्घाटनाची भाषणे आणि मनोरंजनाचे कार्यक्रम सुरू झाले.

अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष श्री अण्णा हजारे यांच्या अनुपस्थीमुळे श्री. उध्दव ठाकरे यांना अध्यक्षपद देऊन त्यांच्या भाषणाने अधिवेशनाचे उद्घाटन झाले. श्री उध्दव ठाकरे यांना विमानांतून फोटोग्राफी करण्याचा आगळा छंद आहे. त्यामुळे अधिवेशनाचे अध्यक्षपद राजकारण्या ऐवजी, एक कलाकार म्हणून त्यांची निवड करण्यांत आली असे सांगण्यांत आले. त्यांचे भाषण ठीक झाले पण उपस्थितांना अण्णा हजारे यांची अनुपस्थिती जाणवली हे निश्चीत !

सकाळच्या कार्यक्रमांत मिशीगन मराठी मंडळाने सादर केलेला "गीत रामायणा"चा नृत्यनाटकाचा कार्यक्रम खूपच रंगला. डॉ. श्रीरंग लेल्यांचे दिग्दर्शन आणि डॉ अर्काटकरांचे संगीत दिग्दर्शन यांचा अनोखी मिलाफ या नृत्यनाटकाला लाभला होता.

भोजनानंतर डॉ. मीना नेरूरकर लिखीत आणि नाटयसंपदा निर्मीत "अवघा रंग एकची झाला" या नाटकाचा बहारदार प्रयोग झाला. हे नाटक पाहताना मराठी संगीत रंगभूमीला या नाटकाने पुर्नजीवन दिले आहे असा भास झाला. गायक कलावंत अमोल बावडेकर, जान्हवी पणशीकर, स्वरांगी मराठे आणि प्रसाद सावकार यांनी नाटकांत खूप रंग भरला.

डॉ.मीना नेरूरकर यांनी श्रीमती आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर अतिसुंदर नाटक लिहिले होते. या नाटकाच्या तालमी तीन महीने चालल्या होत्या आणि हे नाटक अधिवेशनांत सादर केले जाणार होते.परंतु ऐनवेळी कार्यकरिणीने हा कार्यक्रम एका तांत्रीक कारणास्तव रद्द केला.मीना नेरूरकरांची मेहनत आणि तालमीत भाग घेणाऱ्या इतर कलावंताची निराशा झाली आणि अनेक दिवसांची मेहनत वाया गेली.

पहिल्या रात्री सुयोग निर्मीत "हास्य पंचमी"हा कार्यक्रम सादर करण्यांत आला.एवढा निराशाजनक कार्यक्रम सुयोगने आतापर्यंत केव्हाही सादर केला नव्हता.या कार्यक्रमाची जहिरात "मेगा इव्हेंट" म्हणून करण्यांत आली होती आणि जणुं या कार्यक्रमांत हास्य रसाचे पाट वहातील अशी प्रेक्षकांची अपेक्षा होती.कार्यक्रमाची सुरवात देवलांच्या नाटकांतील प्रवेशापासून झाली. पु.ल.पर्यंतचे प्रवेश चांगले झाले. पण त्यानंतर निवडलेले प्रवेश, योग्य अभिरूचीचे नसल्यामूळे, जवळ जवळ ३००० लोकांचे सभागृह निम्याहून अधिक मोकळे झाले. "हास्य पंचमीच्या' कार्यक्रमांत भाग घेणारे कलावंत विक्रम गोखले इत्यदी यांचे 'पाठांतर' हास्यस्पद होते.कारण मागून येणारा प्रॉम्टरचा आवाज नटाच्या आवाजापेक्षा मोठा येत होता. शेवटच्या तीन दिवसापर्यत प्रयेगासाठी कोणते प्रवेश निवडायचे याचा निर्णय 'सुयोग' घेऊ शकले नाहीत आणि काम करणाऱ्या नटांनी आपली भाषणे विमानांत वाचून पाठ करण्याचा प्रयत्न केला आणि 'हास्य पंचमीत' स्वताःचे 'हंसे' करून घेतले.तसेच दुसऱ्या दिवशी सुयोगने सादर केलेल्या "दिवसा तू.. रात्री मी" नाटकाचा प्रयोग प्रेक्षकांना बिलकूल आवडला नाही.सुयोगने आणलेल्या दोन्ही प्रयोगांत मराठी रंगभूमीवर नावाजलेले नट दिलीप प्रभावळकर, विक्रम गोखले, प्रशांत दामले,प्रदीप पटवर्धन, वंदना गुप्ते या सारखे रथीमहारथी असून सुध्दां हे प्रयोग "साफ पडले" असंच म्हणावं लागेल.या कार्यक्रमाची निवड करताना कार्यकारी मंडळाने कोणते निकष वापरले असतील हे वाचकांनी ठरवावे.

दुसऱ्या दिवशी श्रीमती आशा भोसले यांचा वर्तमानपत्रांत गाजावाजा केलेला कार्यक्रम होता. मोठया आशेने बहुसंख्य लोक या कार्यक्रमाला आले. परंतु प्रेक्षकांची घोर निराशा झाली. पहिले कारण म्हणजे एक ते दीड तास कार्यक्रम उशीरा सूरू झाला. संध्याकाळी कार्यक्रम सुरू होण्या आधी शेकाडोनी प्रेक्षकवर्ग प्रवेशव्दारापुढे रांगा लावून उभा होता. क्षणाक्षणाला गर्दी वाढत होती. प्रवेशव्दार उघडले जात नव्हते.लोक अधीर होत होते.बिचारे स्वयंसेवक गर्दीला काबूत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते.अशावेळी कार्यकारिणीच्या एकादया सभासदाने बाहेर येऊन "कार्यक्रम उशीरा कां सुरू होत आहे " याचे काारण देणे अवश्य होते. पण कमेटीचे "सर्वेसर्वा" अथवा एकही मेंबर बाहेर आला नाही. कोणीतरी सांगत होते की हॉल मधले "इलेक्ट्रीकल कानेक्शन" नादुरूस्त झाल्यामूळे कार्यक्रम सुरू होऊ शकत नाही. प्रेक्षकांत अस्वस्थता पसरत होती.लोक घामाघूम होत होते. आरडाओरडा आणि घोषणा सुरू झाल्या. एक प्रेक्षक "झीट" येऊन पडला आणि ॲम्बुलन्स बोलावून त्याला हॉस्पिटलांत न्यावे लागले. शेवटी सव्वाआठला दरवाजे उघडण्यांत आले.प्रचंड गोंधळांत प्रेक्षक स्थानपन्न झाले. त्यानंतर जवळजवळ पाऊण तास वाद्यवृंद आपली वाद्ये जुळवीत होता आणि कार्यक्रम नऊवाजून तेरा मिनिटांनी एकदाचा सुरू झाला.

आशाताईचा कार्यक्रम उशीरा सूरू होण्यामागचे खरे कारण असे सांगण्यांत येते की त्यांना हॉटेलमधून आणण्यासाठी जाणारे कमेटीचे सभासद मूलतः उशीरा गेले.सर्व वाद्यवृंद ताफ्याला एकत्र आणीपर्यंत आणखी उशीर झाला. स्टेजवर आल्यावर वाद्यांची संगीतबध्द जुळवाजूळव करण्यास पाऊणतास लागेल अशी पूर्वसूचना आशाबाईनी दिली होती. या सर्व घटना टाळण्यासारख्या होत्या. असं असताना 'कार्यक्रम उशीरा" चालू होण्याचा दोष आशातााईचा नव्हता तर नियेजकांचा ढिसाळपणा कारणीभूत होता असेच नाईलाजाने म्हणावे लागेल.

त्याा रात्री झालेला आशा भोसले यांचा मराठी गाण्याचा कार्यक्रमाने प्रेक्षकांच्या 'आशा' भुई सपाट झाला. मुख्य कारण म्हणजे आशाताईचा आवाज. वयोमानाप्रमाणे आशातााई भोसले यांचा कोकीळकंठी आवाज आता घोघरा झाला आहे आणि हा आवाज गाण्यास योग्य राहिला नाहीये. या मुळे आशातााईनी आता "निवृत्ती" घ्यावी अशी प्रेक्षकांमध्ये कुजबुज चालली होती.

भारतांतून आणलेल्या या दोन्ही कार्यक्रमांनी उपस्थितांची जबरदस्त निराशा केली. जमेची बाजू एवढीच की पुण्याचे विद्यावाचस्पती पं. शंकर अभ्यंकर यांचे भाषण व हिंदुधर्मावरील प्रवचन, पं. शौनक अभिषेकी , राहूल देशपांडे आणि रघुनंदन पणशीकर यांनी सादर केलेला भक्तिगीतांचा "धरोहर", भिमराव पांचाळ यांचा मराठी गझलांचा कार्यक्रम, आणि सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली नाना पाटेकर यांची मुलाखत- 'आपला नाना', या कार्यक्रमांनी बाहेरून आणलेल्या कार्यक्रमांची आणि पर्यायाने कार्यकारिणीची लाज राखली.

या उलट, मनोरंजनाच्या कार्यक्रमांत काही स्थानिक संस्थांनी सादर केलेले कार्यक्रम बहारदार होते. त्यांत उल्लेखनीय प्रथम दर्जाचा कार्यक्रम म्हणजे टोरांटो मंडळाने सादर केलेला 'स्वरगंध' , तसेच सियाटलचा 'तालवाद्य त्रिगलबंदी', अर्चना जोगळेकरचा नृत्याचा कार्यक्रम आणि डल्लास मंडळाने पेश केलेला 'रसरंग' हे होत. टोरोंटोचा कार्यक्रम खास लेकाग्रहास्तव एकाच दिवशी दोनवेळा सादर करावा लागला.

अधिवेशनाच्या संदर्भात, मे महिन्याच्या बी. एम. एम. वृत्तांत अधिवेशनाचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. श्रीराम मुलगुंद यांचा पहिल्या पानावरील अग्रलेख विचार प्रवर्तक होता, इतकेच नव्हे तर गेल्या कित्येक अधिवेशनांत झालेल्या त्रुटीवर प्रखर प्रकाशझोत टाकणारा होता. या पूर्वी १९९९ सॅनहोजे येथे झालेल्या अधिवेशवासंबधी, कॅलिफोर्नियाच्या श्रीमती संध्या कर्णिक यांचा अतिशय परखड असा लेख वाचनांत आला होता. त्या अधिवेशनांत केलेली पैशाची खैरात अशीच टीकेला कारणीभूत झाली होती. न्यूयॉर्कच्या अधिवेशनांत राजकीय पुढाऱ्यांनी घातलेला सावळागोंधळ आणि स्वागताध्यक्ष डॉ. प्रकाश आमटे यांच्या भाषणाला दिलेले दुय्यम स्थान असेच लक्षांत येण्यासारखे होते.

"नेमेची येतो मग पावसाळा" या उक्तीप्रमाणे BMM अधिवेशनांत येणारा तोचतोचपणा आता अगदी शिगेला पोहचलेला आहे असे म्हटले तर फारशी अतिशयोक्ती होऊ नये. मूलतः BMM ही संघटना, अमेरिकेंतील बहुतेक सर्व मराठी मंडळांची प्रातिनिधीक संघटना (Apex Body) असून, इथल्या 'मराठी लोकांची आणि मराठी लोकांसाठी' नियोजीत केलेली प्रातिनिधीक सघटना आहे असा आमचा समज आहे. या संघटनेच्या व्दिवार्षीक अधिवेशनांत प्रमुख स्थान आणि महत्व असायला हवे, इथल्या स्थानिक मराठी रहीवाश्यांचे. आज आपल्या इथे जागतीक क्षेत्रांत नांव कमावलेले शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, विचारवंत, साहित्यिक, अर्थशास्त्रज्ञ, मानवताप्रणीत डॉक्टर्स असे अनेक विविध क्षेत्रांतील मान्यवर असताना, भारतांतून राजकारणी आणि तथाकथीत कलावंत 'अध्यक्ष' म्हणून आणण्याची काही आवश्यकता आहे कां?

दुसरं असं की आज ४० वर्षाच्या कालांत आमच्याकडे उत्कृष्ट नाटके बसविणारे दिग्दर्शक, त्यांत कामकरणारे कलावंत, वादक, गायक इत्यादी मनोरंजन क्षेत्रांतील प्रतिभावान (talented) लोक उपलब्ध आहेत. वानगी दाखल संगीत क्षेत्रांतील काही वेचक नावे द्यायची झाली तर कॅलिफोर्नियाचे गोपाळ मराठे, न्यूजर्सीचे माधव भाटगी आणि सूजन राणे, हयुस्टनच्या अंजली पंडीत, टोरांटोचे नरेंद्र आणि रवि दातार, समिधा जोगळेकरे, मधुरा गोखले ही सुपरिचीत नावे देता येतील. नाटय क्षेत्रांत गाजलेली डॉ. मीना नेरूरकर, अशोक कामेरकर, शरद कवडी, दळवी अशी काही नावे आहेतच. असं असताना बाहेरून अमाप पैसे देऊन, बाहेरच्या लोकांचे कार्यक्रम आणणे योग्य आहे कां ? याचा विचार सुज्ञांनी करावा.

BMM च्या अधवेशनाला हजर रहाणाऱ्यांची टक्केवारी काढल्यास असे नक्कीच निदर्शनास येईल की अदमासे साठ टक्के हजर रहाणारे पन्नासीच्या पुढचे ज्येष्ठ नागरीक असतात, वीस टक्के २५ ते ५० पर्यंतचे मध्यमवयीन आणि बाकी वीस टक्के युवा गटांतील असतात. सर्वसाधारणपणे असं दिसून आलं आहे की आजचे मध्यम वयाच्या गटांतील रसिक लोक, नाकमुरडत कां होईना, काही कार्यक्रम पहातात आणि सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतात, या वेळी युवा गटांतील उपस्थितांसाठी काही चांगले कार्यक्रम राबविले गेले. फक्त मनेरंजनाचा उद्देश्य डोळयासमोर न ठेवता काही विधायक कार्याची त्यांना हेतूपूर्वक जाणीव करून देणे अवश्य आहे. या अधिवेशनांत असा प्रयत्न करण्यांत आला या बद्दल युवा कमेटीचे सदस्य शाबासकीस पात्र आहेत. या संदर्भात अंजली आठवले हिने ७ जुलैच्या Wall Street Journal मध्ये एक अती सुंदर आणि समर्पक लेख लिहिला आहे. तो वाचनीय तर आहेच पण शिकागोच्या मंडळाने आमच्या तरूण पिढीच्या संदर्भांत त्यांतील काही मुदयांचा जरूर विचार करावा. नवीन पिढीच्या भावना -गरजा आम्ही कधी मनलावून, मोकळेपणाने ओळखायचा प्रयत्न केला आहे कां, या मुलांची कुटुंबापासून अलिप्त रहाण्याची वृत्ती आणि त्याची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे कां इत्यादी आवश्यक गोष्टीचा मागोवा घ्यावा व शिकागो अधिवेशनांत तशी आंखणी करावी.

आज गरज आहे ती इथल्या समाजांचे प्रश्न समजून घेण्याची आणि ते सोडविण्याची. इथे आलेली दुसरी पिढी आता निवृत्तीच्या मार्गावर आहे. त्यांच्या पुढे अनेक प्रश्न आहेत. मुलांची शिक्षणे, त्यांच्यावर होणारे इथले इष्टानिष्ट संस्कार व त्याचे कुटुंबावर झालेले परिणाम, मुला मुलींच्या लग्नाचा प्रश्न, निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरीकांची आजारपणामुळे झालेली आर्थिक कोंडी किंवा दीर्घ आजारा नंतर किंवा दोघांपैकी एक निवर्तल्यानंतर झालेला आर्थिक आणि भावनीक कोंडमारा, या सारखे अनेक प्रश्न विचारांत घेण्यालायक आहेत. These are the needs, of our generation, here in USA.

मागील काही संबधीत वर्षांची BMMची बजेट्स एक लाख डॉलर्सपेक्षा जास्त रकमेची असली पाहिजेत. प्रत्येक अधिवेशनांत उपस्थितांचा आंकडा वाढविण्यासाठी चढाओढ लागलेली दिसून येते. न्यूयॉर्क , अटलांटा, सियाटल आणि आताचे फिलाडेल्फीयाचे अधिवेशन.. या सर्व ठिकाणी हीच चुरस असल्याचे दिसून आलं आहे.

या नंतरची अधिवेशने पांच हजार उपस्थितांपेक्षाही जास्त संख्येची होतील असे काही मंडळींचे भाकीत आहे. अशी परिस्थिती निर्माण होईल असे आम्हाला तरी वाटत नाही. परंतु असे जर होणार असेल तर बृहन महाराष्ट्र मंडळाने पूर्व, पश्चीम, दक्षिण आणि उत्तर असे विभाग पाडून, त्या त्या भागांत रहाणाऱ्यां मराठी कुटुंबासाठी "विभागीय अधिवेशने" भरवावीत असे काही उत्साही मंडळींचे म्हणणे आहे. असे घडल्यास उपस्थितांचा प्रवासखर्च तर वाचेलच पण प्रमुखतः अशी विभगीय अधिवेशने लहान जागेत भरविता येतील व कमी खर्चाची होऊन जास्त शिस्तबध्द होतील अशी आशा व्यक्त केली जात आहे. आम्ही त्यांना सुयश चिंततो.

पण तोपर्यंत वाचकहो, मन विषण्ण होऊन जातं ! आज इतक्या वर्षानंतर बृहन महाराष्ट्र मंडळाची ही "प्रगती" पाहिल्यानंतर असं वाटतं की सुरवातीला सातशे ते हजार लोकांच्या उपस्थितीत साजरी झालेली ती अधिवेशने खूप आनंददायी होती, अधिक जिव्हाळयाची होती. पुढील अधिवेशनांची परंपरा या दोन चार मागील अधिवेशनासारखीच राहिली तर शंका वाटते की उपस्थितांची संख्या तर कमी होईलच, पण कित्येकांची या अधिवेशनावर 'बहिष्कार' घालण्यापर्यंत पाळी आली तर आश्चर्य वाटू नये !

शिकागोमधील कार्यकारिणी, उपस्थितांच्या संख्येवर निर्बंध घालून आणि तितक्याच संख्येला पुरेसे आटोपशीर सभागृह निवडतील अशी आशा आहे. तसेच "भाडोत्री" कलावंत आणि त्यांचे

कार्यक्रम न ठेवता, स्थानिक संस्थांना आणि कलावंतांना संधी देणे हा मूलभूत उद्देश्य अंमलात आणेल ही अपेक्षा. या अधिवेशनाचे अध्यक्षपद फक्त मराठी राजकारण्यांना आणण्याचा अनाठाई आग्रह न धरता, त्यासाठी येथील स्थानिक, नामवंत व्यक्तींना पाचारण करावे. विज्ञान, रसायन, संशोधन ,साहित्य, सामाजिक बांधिलकी, वैद्यकशास्त्र, शिक्षणशास्त्र अशा अनेकविध क्षेत्रांत येथे नामवंत माणसे काम करून राहिली आहेत.अशा व्यक्तीने अध्यक्षपद भूषविणे येथील सर्व महाराष्ट्रीयांना अभिमनास्पद होईल हे निःसंशय ! पुढल्या दोन वर्षाच्या कालावधीत BMM- Chicago यांतील काही पदाधिकाऱ्यांनी निरनिराळया महाराष्ट्र/ मराठी मंडळास प्रत्यक्ष भेट देऊन त्या त्या मंडळाच्या अपेक्षा, सूचना लक्षांत घ्याव्यात व त्यावर विचार करून कार्यक्रमांबाबत निर्णय घ्यावेत.

BMM ने आपल्या बचेटमधून पंचवीस टक्के रक्कम अश्या इथल्या सामाजिक प्रकल्पांसाठी काढून ठेवल्यास, ही प्रातिनिधीक संघटना आपल्या उद्दीष्टांना प्रामाणिक राहिली असे म्हणता येईल. BMM ने निरनिराळया प्रांतांतील मराठीमंडळा मार्फत, युवागटांतील लोकांसाठी इथल्या हॉस्पिटलांत स्वयंसेवक म्हणून काम करण्याचे विधायक कार्यक्रम हाती घ्यावे. "Meals on Wheels" सारखे कार्यक्रम अनेक गावांतून शहरांतून उपलब्ध आहेत. त्यांची माहिती मुखपत्राव्दारे कां देऊ नये? या देशांत अनापोलीस येथे 'नेव्हल ॲकेडमी' आहे, तसेच कालोराडो स्प्रिंगज, कालोराडो येथे यू.एस.ए.एअरफोर्स अकॅडमी" आहे. या व अश्या संस्थांची माहिती आपल्या मुखपत्रव्दारा कां देऊ नये ? आम्हाला ठाऊक आहे की ही सर्व माहिती Google वर उपलब्ध आहे. पण आम्ही ती जर आमच्या पत्रकांतून दिली तर नुकसान होणार नाही. आज गरज आहे मराठी मंडळांना मार्गदर्शनाची आणि ही अपेक्षा फक्त BMMच पुरी करूं शकते.

BMM वृत्ताला जीवंत रहाण्यासाठी जितकी पैशाची गरज आहे तितकी गरज, भारतांतल्या नाटकवाल्यांना अगर गाणं म्हणणाऱ्या कलावंताना, जिवंत रहाण्यासाठी BMM कडून मिळणाऱ्या भक्कम बिदागीची गरज आहे कां ?

मित्रांनो, स्पष्टोक्ती जरा बोचरी असते याची आम्हाला जाणीव आहे. पण तिच्यामुळें समाजाचे नुकसान न होता काही योग्य बदल घडून आल्यास अधिवेशनास उपस्थित रहाणाऱ्यांस निश्चीत समाधान लाभेल.

जूलै २५,२००९ दिवाकर कारखानीस
ह्युस्टन

( वरील लेखाचा मसुदा तयार झाल्यानंतर काही स्नेह्यांनी नवीन मुद्दे सूचविले. ते या लेखांत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.)